# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी पोर्टल-२०२१/ (८४४३/२१)/शिष्यवृत्ती/ 8184 दिनांक : १८.११.२०२१

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - महाविद्यालय तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य २०२१/डीबीटी/१३३२९ दि. १३.११.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांची शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन तात्काळ पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि दि. १२.११.२०२१ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०१९-२० व सन २०२०-२१ मधील खालीलप्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नाव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१ |
| १ | पुणे | २८६ | ४७० | १ | २३ | २६१ | ४०९६ |

महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच पडताळणी करीता प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.